e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024
SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Journal for all Subjects
Research Article / Survey Paper / Case Study
Published By: SK Publisher
(www.skpublisher.com)
*A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal*
Special Issue: National Interdisciplinary Conference on "Women Empowerment: Issues, Challenges and Solutions"
Organised by: Department of Political Science & I. Q. A. C., Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.
(Sponsored by PM-UShA Grants to Strengthen Colleges)

# संगीत क्षेत्रात महिलांचे सक्षमीकरण आणी योगदान

**Prof. Dr. Sunil Parise**
**Associate Professor & HOD**
**Department of Music**
**Shree Ganesh Kala Mahavidhyalaya**
**Kumbhari,Tq.Dist.Akola**
**DOI: https://doi.org/10.61165/sk.publisher.v11i12.57**

प्रस्तावणाः

महिला सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहे तसेच महिला पुरूषांच्या खांदयाला खांदा लावुन काम करत आहे. केवळ चूल आणी मूल या पुरते मर्यादित न राहता महिलांनी भरारी घेतलेली आहे. महिला आणी पुरूष हा भेद कमी झाला असला तरी समाजात आजही काही ठिकाणी महिलांना वेगळी वागणूक दिली जात असल्याचे लक्षात येते. महिला म्हटले की, त्या नाजूक आणी त्यांना काहीही जमत नाही असे समजले जात असले तरी याच समाजात राहुन महिलांनी स्वतः त्यांची ओळख निर्माण केल्याचे चित्र दिसत आहे. खेडयापाडयातील तांडा वस्तीतील शहरातील महिला सक्षमीकरणा करीता धडपड करतांना दिसत आहे. शिक्षण, नोकरी, व्यवसाय, राजकारण, समाजकारण याही क्षेत्रात महिलांची प्रगती होतांना दिसत आहे. स्वतःहाची बौध्दीक पातळी ओळखून अनेक क्षेत्रात नावलौकीक मिळविण्या करीता कार्य करत आहेत. महिला सक्षमीकरण महिलांना ते बळ देते जे त्यांना त्यांच्या हक्कासाठी लढण्यास मदत करते. एकविसावे शतक हे स्त्रीच्या जीवनातील आनंदी व स्वावलंबी राहण्याचे शतक आहे. महिला आता जागृत आणी सक्रीय झाल्या आहेत. जेव्हा एखादी स्त्री तीच्यावर लादलेल्या बेडया आणी बंधनं तोडायला लागते तेव्हा जगातील कोणतीही शक्ती तिला रोखू शकत नाही. अजुनही शिक्षण आणी मुक्तपणे काम करण्यासाठी सुरक्षित प्रवास सुरक्षित काम आणि सामाजिक स्वातंत्रा करीता समर्थनाची गरज आहे. महिला सक्षमीकरणाचे हे कार्य अत्यंत महत्वाचे आहे कारण भारताची सामाजिक आर्थिक प्रगती ही महिलांच्या सामाजिक आर्थिक प्रगतीवर अवलंबुन आहे.

**सक्षमीकरणाचा अर्थः-**

स्त्री ही सृष्टीची शक्ती मानली जाते म्हणजेच मानव जातीचे अस्तीत्व स्त्रीपासुनच आहे. असे मानले जाते. महिला सक्षमीकरणाचा अर्थ या निर्मीतीच्या शक्तीचा विकास आणी परिष्कृत करणे आणी तिला सामाजिक, आर्थिक, राजकीय, न्याय, विचार, स्वातंत्र, श्रध्दा, धर्म आणी उपासना, संधीची समानता प्रदान करणे आहे. दुस-या शब्दात महिला सक्षमीकरण म्हणजे

*© 2024, SK Publisher All Rights Reserved* 

महिलांची सामाजिक आणी आर्थिक स्थिती सुधारणे जेणेकरून त्यांना रोजगार, शिक्षण, आर्थिक प्रगतीच्या समान संधी मिळतील जेणे करून त्यांना सामाजिक स्वातंत्र आणी प्रगती मिळेल. ज्याव्दारे स्त्रिया पुरूषाप्रमाणे त्यांच्या प्रत्येक आकांक्षा पुर्ण करू शकतील. सोप्या शब्दात सक्षमीकरणाची व्याख्या अशाप्रकारे केली जावु शकते की, यामुळे महिलांमध्ये ती शक्ती येते, त्यातुन ती तीच्या जीवनाशी संबधीत प्रत्येक निर्णय स्वतः घेवु शकते. कुंटुंब आणी सामाजात चांगले जगू शकते.

महिला सक्षमीकरण म्हणजे त्यांना समाजात त्यांचे खरे अधिकार देणे होय. त्यांना इतके सक्षम केले जावे कि त्या प्रत्येक क्षेत्रात स्वतंत्र वाहुन घेण्यास सक्षम होतील.

**महिला सक्षमीकरणाची गरजः-**

भारतात महिला सक्षमीकरणाची अनेक कारणे आहेत. प्राचिण काळाच्या तुलनेत मध्ययुगीन काळात भारतीय महिलांच्या सन्मानाची पातळी लक्षणीयरित्या कमी झाली, त्यांना प्राचीण काळात जो आदर दिला जात होता मध्ययुगीन काळात तो आदर कमी होवू लागला. आधुनिक युगात अनेक भारतीय महिला अेनक महत्वाच्या राजकिय आणि प्रशासकीय पदावर विदयमान आहेत. त्या तुलनेत सामान्य ग्रामीण महिलांना अजुनही त्यांच्या घरात राहण्यासाठी भाग पाडले जात आहे आणि त्यांच्याकडे सामान्य आरोग्य सुविधा आणि शिक्षण या सारख्या अत्यंत महत्वाच्या गरजा पुर्ण होत नाही. अनेक सुविधा नाहित शिक्षणाच्या बाबतीतही भारतातील महिला पुरूषापेक्षा खुप मागे असलेल्या दिसुन येतात. शहरी भागातील महिला ग्रामीण भागातील महिलापेक्षा रोजगारक्षम आहेत. भारतातील शहरामध्ये सुमारे ३० टक्के महिला स्वॉप्टवेअर उदयोगात काम करतात. ग्रामीण भागातील ९० टक्के स्त्रिया प्रामुख्याने रोजनदारी शेती आणि संबधीत कामात गुंतलेल्या दिसतात.

**महिला सक्षमीकरणात येणा-या अडचणीः-**

भारतीय समाज हा अनेक प्रकारच्या रूढी, परंपरा, यावर अवलंबून असुन आजही पुरूषप्रधान संस्कृतीमुळे अडसर निर्माण होतो. प्रत्येक घरामध्ये आजही कुटुंबप्रमुख म्हणुन पुरूषाला समजले जाते त्यामुळे महिला जर अधिक प्रमाणात आर्थिक उन्नत झाल्या तर कुठेतरी पुरूषांच्या आत्मसन्मानास ठेच लागल्यासारखे होते. त्यामुळे घरातील कमी शिक्षीत किंवा अशिक्षीत महिलांनी घराबाहेर जावुन रोजगार मिळविण्याचे पाउल उचलण्याची हिम्मत केल्यास घरातील कुटुंब प्रमुख पुरूष सर्वप्रथम मोठा अडसर निर्माण करतो. तसेच महिलांच्या सक्षमीकरणात खालील प्रमाणे अनेक अडचणी दिसुन येतात.

१) सामाजिक असुरक्षीतता.

२) व्यवसायीक अर्हता ची कमतरता.

३) अत्यल्प शिक्षण किंवा अशिक्षीतपणा.

४) वाचन नसल्यामुळे व्यवहारीक ज्ञानाची कमतरता.

५) शासनाच्या महिला सक्षमीकरणाच्या योजना महिलांपर्यंत न पोहचणे.

६) मागासलेल्या वातावरणातील राहणीमानामुळे आत्मविश्वासाची कमतरता.

७) कामाच्या ठिकाणी मिळणारा अत्यल्प मोबदला व आर्थिक शोषण.

८) घरातील दैनंदिन कामकाज व मुलांचे संगोपनामुळे वेळेची कमतरता.

महिला सक्षमीकरणाबाबत चर्चा होत असतांना असेही लक्षात येईल की, स्वातंत्र मळिण्यापुर्वी पेक्षा स्वातंत्रनंतरच्या काळात महिलांच्या प्रगतीत उन्नतीत ब-याचअंगी टप्याटप्याने वाढ झालेली दिसून येते. अनेक क्षेत्रापैकी संगीतकला क्षेत्रात कार्य करणा-या काही नामांकित महिलांची कामगिरी अधोरेखित केलेली आहे. यावरून लक्षात येईल की, महिला सक्षमीकरण पुर्वीपासुनच चालत आलेली परंपरा असावी.

**गानप्रभा डॉ.प्रभा अत्रेः-**

जाणकार आणि समर्थ संचालिका होत. त्यांच्या बहुविध सांगि तेक कार्याबद्दल जगतगुरू श्री शंकारचार्यांनी त्यांना गानप्रभा ही बहुमान्य उपाधि १९७५ मध्ये देऊन सन्मानित केले आहे ते सार्थ आहे. विशेष म्हणजे त्या विज्ञा- पदवीधर आणि कायद्याची एल. एल. बी. परिक्षा उत्तीर्ण केलेल्या वकील असुनई संगीत विषयात शास्त्र व कलेचा सखोल अभ्यास करून त्यांनी डॉक्टरेटची डिग्री संपादन केली. ही तिन्ही वेगळी टोके त्यांनी कशी काय साध्य केलीत याचेच खरे तर आश्चर्य वाटते ? पण त्याच वेळी त्यांच्या बुध्दिगम्य विचारांची, कोणत्याही विषयाचा आशयाचा डोळस दृष्टीने सखोल अभ्यास करण्याची आणि शोध बोधपूर्वक स्वतःचे मत स्पष्टपणे व्यक्त करण्याची त्यांची ध्येयलालसा, जिज्ञासा बघितली की खात्रीच पटते की प्रभाताईंनी शिक्षण-कला विकासाकरताच स्वतः वे जीवन समर्पित केलेले आहे. त्यांच्या जीवनात सुखद, शांत, प्रसन्न प्रभा उमटली आहे, संगीताची कार्य-कृती उमलली आहे, सदैव नवनवोन्मेषशाली कल्पना उजळली आहे म्हणूनच प्रभाताईंनी संगीत विश्वात स्वतःची आगळी वेगळी प्रभावळ निर्माण करून ठेवलेली आहे यात शंकाच नहीं !

**गानयोगिनी सौ. किशोरी अमोणकरः-**

"किशोरी, कंठानं नाही तर ती आत्म्यानं गाते" असे दर्द भरे उद्‌गार जगप्रसिद्ध कलावंत पं. रविशंकरजींनी मोठ्या आत्मियतेने काढलेले आहेत जातीवंत कलाकारच खऱ्या कलेचं मूल्यमापन जातीनं करीत असतो. संगीताध्ययनाकरता चांगला, योग्य गुरू मिळायलाही भाग्यच लागतं. त्याहीपूर्वी म्हणजे घरंदाज कलावंताच्या पोटी जन्माला येणं, कलावंत म्हणून बाळसणं, संगीताचं बाळकडू लाभणं ह्याही गोष्टींचा योगायोगच किशोरीताई खरोखरीच भाग्यवान ! श्रीमती मोघूबाई कुर्डीकरांच्या पोटी जन्म घेऊन जयपूर घराण्याच्या अल्लदियाखांसाहेबाचा जपणाऱ्या, मातोश्रींचं मार्गदर्शन लाभलेल्या, आग्रा घराण्याचे उस्ताद अन्वरहुसेनखां यांची आणि भेंडीबाजारच्या अंजनीबाई मालपे- करांची अप्रतिम तालीम प्राप्त करून एक दर्जेदार गायिका म्हणून लौकिक संपादन करणाऱ्या किशोरीताई म्हणजे संगीत जगतातल्या महान आश्चर्य आहेत, जाणकार - जागृत - जबरदस्त गायिका आहेत.

जीवनात बालपण आलंच नाही. वडील अकाली वारल्यामुळे घरची वडिलकी स्वीकारावी लागली. गोपालकृष्ण' मधील कृष्णाच्या भूमिकेप्रमाणे संसाररूपी पर्वत करांगळीवर धरला आणि 'माणूस' मधल्या भमिकेप्रमाणे संसाराचा तोल सुद्धा बेमालूमपणे सावरला." रामभाऊंच्या अनेक मैफिली आठवणीत आहेत. १९६० च्या महाराष्ट्र राज्य संगीत परिषदेत ते गायले, श्रीराम संगीत महाविद्याल- यच्या वर्षिकोत्सवात ते जमून गायलेत. राजाराम वाचनालयाच्या खुल्या प्रांगणात बऱ्याच वर्षांपूर्वी दीडतास 'नंद' राग आनंदात आळवलेला अजूनही स्मरणात आहे. ते कोट्या उत्तम करायचे- साथसंगतकारांना उद्देशून ते एकदा सहज विनोदाने बोलून गेले - "जरा काही तरी चांगलं वाजवा, काहीतरीच वाजवू नका." त्यांची शेवटची खाजगी बैठक बापूसाहेब आठवले यांच्या आर्टस स्कूलमध्ये झाली होती. १९८७ मध्ये रामभाऊंना संगीत नाटक ऍकॅदमीचा पुरस्कार मिळाला तोच अवघ्या दीड वर्षातच ऑक्टोबर १९८९ मध्ये त्यांचे निधन झाले त्यांच्या अमृत महोत्सवाचे भाग्य मिळण्यापूर्वीच कायमचा पडदा पडला तरी "जय शंकरा गंगाधराचे" सूर पडद्याआडूनही कानावर पडत राहणारच ! रामभाऊ म्हणायचे- "चांगलं गाता वाजवता येण्याकरता गुरूनिष्ठा-कलानिष्ठांचं निकटत्त्व आणि द्रव्यनिष्ठा-प्रसि- द्धीनिष्ठांचं दूर त्व हवं. राग शिकल्यानंतर मनन चिंतन आवश्यक असतं रागातल्या वादीसंवादी स्वरांना नमस्कार करूनच गावं लागतं कारण वादी संवादी स्वर म्हणजे रागांचे आईवडील होत.

**स्वरसम्राज्ञी लता मंगेशकरः-**

प्रसिद्ध कवि पी. सावळाराम ह्यांनी शब्दांकित केलेली काव्यर- चना लतादीदींनी आपल्या सुरेल भावस्पर्शी आवाजाने किती तरी वर्षांपूर्वी गायली, नुसतीच गायली नाही तर अमर कलाकृती करून ठेवली आहे. कुठल्याही समाजाच्या, धर्मियांच्या लग्न प्रसंगी कन्येला सासरी धाडतांना "जा मुली जा, दिल्या घरी तू सुखी रहा..." असा संदेश आशीर्वाद, सुरेल सुस्वर निरोप देतांना लतादीदींच्या ह्या दर्दभऱ्या गाण्याच्या ओळी आठवतात आणि सर्वांचे मन गहिवरून जाते, डोळ्यातून गंगा- जमुना वाहू लागतातच वरातीच्या वेळी बॅन्डवर हे आर्त गीत वाजवलं गेलं की वातावरण स्वब्ध होऊन जातं. त्यांच्या आवाजात काय नाही ? विलक्षण जादू, गहराई, खोलाई, गोलाई, डेफ्थ आहे, फिरकी गिरकी आहे; लोंच आहे धार-झार आहे, उत्तुंगता, भरारी आहे, ओजस्वीतता, आर्तता आहे; भक्तिभाव प्रसन्नता आहे; विविध रसभावात्मकता आहे. तरी केवळ आवाजाविषयीचे शब्दांकन अपूर्णच मग, त्यांची तयारी, शब्द-ताल-लय प्रभुत्व, विविध भाषेवरचं, गीत गायनावरचं कौशल्य वर्णन पुढे यायबच आहे. सांगून जमायचं नाही, लिहून संपायच नाही असं कलाविश्व लतादीदीच्या गळ्यात नी गाण्यात सामावलेलं आहे.

लता दीदीच्या नावातच सप्त शब्द, सप्तसूर आहेत- जादूची किमया आहे. "लता मंगेशकर ही सप्त स्वरांची प्रत्यक्ष गंधर्व कन्या "गंधार स्वर घेऊनच तू जन्माला आलीस, तूं नाव उज्वल करशील" असे त्यांचे वडील मास्तर दीनानाथ ह्यांनी तिच्या बालवयातच भाकित केले होते- ते अक्षरशः खरे ठरले.

लता दिदीच्या जीवनावर कीतीतरी विद्वतजनांनी लेख लेखन, ग्रंथ, गौरव अंक विपुल साहित्य प्रसिद्ध केलेलं आहे तेव्हा माझ्यासारख्या सामान्य माणसानं केवळ तीन-चार पानांचा मजकूर लिहिणं, धावता आढावा घेणं सुद्धा किती हास्यास्पद व अपूर्ण होईल? याची मला कल्पना 'असूनही दोन शब्द का होईना प्रस्तुत ग्रंथात त्यांच्या चरित्र लेखनद्वारा त्यांना एक मानाचा मुजरा

करतो आहे, मानाचं एक पान जोडतो आहे. त्यांनी आणि इतर रसिकांनी, वाचकांनी ते स्वीकृत करावं एवढीच प्रार्थना- त्यातच आमचा आनंद "आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहिकडे.

लतादीदीचा जन्म २८ सप्टेम्बर १९२९ रोजी शनिवारी इंदोर मुक्कामी झाला त्यांचे वडील मास्तर दीनानाथ मंगेशकर प्रसिद्ध गायक नट. वे मुळचे गोव्यातले गोमंतकीय नाटकांच्या व संगीताच्या निमित्ताने मंगेशकर कुटुंब भ्रमंतीला निघाले दौरा करीत असतांना इंदोर मुक्कामी लतादीदीचा जन्म झाला दीनानाथांच्या प्रथम पत्नीपासून (लतिका नामक कन्या) झालेली पहिली मुलगी प्रसुति रोगामुळे माता आणि कन्या दोघीही वारल्या.

**गानकोकिळा सौ. हिराबाई बडोदेकरः-**

"उपवन "उपवन गात कोकिळा" " हे पद एके काळी लहानथोरांच्या तोंडी सहजतेने गुणगुणल्या जात असे. हिराबाईंचे हमखास, सदाबहार पद - बैठकीत प्रचंड दाद घ्यायचेच फार पूर्वी नागपूरच्या राजाराम वाचनालयाच्या खुल्या मंचावर त्यांची बैठक मस्त रंगात आलेली, बाबूराव कुमठेकर सारंगीची साथ करता करता संधी साधून एखाद्या सुरेल सफाईदार हर कतीने दाद घ्यायचे तसे शमसुद्दीनखांसाहेब आपली तबल्यावरची नजाकत पेश व रून त्यात आणखी भर टाकायचे अशा अपूर्व स्वरानंदात मध्यंतरानंतरही त्यांनी आपले पेटन्ट पद म्हंटले नाही तेव्हा रसिकांची उत्स्फूर्त फर्माईश "उपवनी... म्हणा", "वद जाऊ म्हणा.." शेवटी हिराबाईंनी "उपवनी गात कोकिळा" आणि "वद जाऊ कुणाला शरण" ही दोन्ही पदे अशी कांही दर्दभरी गायलीत की त्यानंतर त्यांचा प्रत्यक्ष जलसा ऐकण्याचा योग आला नसला तरी ती पदे, शब्द-स्वरांचा तो लडिवाळपणा, लयीचा सच्चेपणा आणि गाण्याचा एकूण प्रभावी ठसका आज ही मनातल्या मनात स्मृतिनी सुखावून जातो. युगप्रवर्तक गायिका, समर्थ नायिका, दर्जेदार मार्गदर्शिका म्हणून गौरविल्या गेलेल्या गानहिरा हिराबाईंचा खरोखरीच "धन्य जन्म जाहला" प्रमाणे संगीताच्या इतिहासात त्यांचे नाव अमर राहील, सदैव कीर्ती तेवत राहील- यांत शंका ती कसली !

**परवीन सुलतानाः-**

"बदलत्या काळाप्रमाणे विविध घराण्यातलं कलासौंदर्य आणि बैठकीचं सौंदर्य ह्यात स्वतःला सामावून घ्यावं" असे सौंदर्यकलासम्राज्ञी श्रीमती परवीन सुलताना यांचे मत आहे. नागपूरला त्यांचे बरेच कार्यक्रम झालेत, पुढेही होणार त्यांचा मी ऐकलेला पहिला कार्यक्रम भारतीय विद्याभवन केन्द्रातर्फे आयोजित एका भव्य - दिव्य जलशातला - आमदार निवासाच्या प्रांगणातील शामियान्यात ऑक्टोबर १९७४ ला झालेला. गायनापूर्वी महाराष्ट्राचे लाडके सभापती स्व. शेषरावजी वानखेडे यांचा षष्ट्यद्विपूर्ती सत्कार समारंभ प्रसन्न वातावरणात पार पडला होता. नंतर प्रभाकर चाफेकरांनी निवेदन केले. रसिक उत्सूक होते ते बाईंच्या गाण्याला. परवीनजी व्यासपीठावर येताच प्रचंड टाळ्यांनी त्यांचे प्रथमारंभीच उत्स्फूर्त स्वागत झाले. त्यांच्या साथीला मुंबईच्या वासंती म्हापसेकर हार्मोनियमवर आणि भास्करराव तिवसकर तबला संगतीला होते. सौ. मंदाकिनी पत्तरकिने तानपुरासंगतीला होत्या. अतिशय सुरेल स्मित हास्य, पुरेल स्वरूप अन् सुरेल गायन असा अपूर्व संगम म्हणजे परवीनजी. त्यांनी सुरेल तानपुऱ्यांच्या नादविश्वात रसिकांना क्षणार्धात तादात्म्य करून टाकले. 'पुरियाध्धनाश्री रागात बडा - छोटा ख्याल तयारीने

आळवला. त्यांच्या गाण्याच्या लकबीवर रून, तयारीवरूनच कुणालाही जाणीव व्हावी की ह्या गायिका पतियाला घराण्याच्या असाव्यात. आणि ते खरेच ठरले. बडेगुलामअली खांसाहेबांचे शिष्य महंमद इनामत मजीतखां हे परविन सुलतानाजींचे वडील होत. वडील उत्तम गायक पर्यायाने पतियाळा घराण्याचा वारसा बाईंना मिळाला. केवळ वारसदार नव्हे तर त्या पतियाळा घराण्यातल्या तैयारीच्या एक अधिकारि गायिका ठरल्या. खुद्द बडेगुलाम अलीखां साहेबांनीही परवीनजीच्या गाण्याची प्रशंसा केली होती. पर त्रीनजींनी चिन्मय लाहीरींचे ही शिष्यत्व संपादन केले.

**गजल सम्राज्ञी-बेगम अख्तरः-**

बेगम अख्तर ह्या विवाहापूर्वी अख्तरी फैजाबादी नावाने प्रसिद्ध होत्या. पतियाळा आणि किराना घराण्याच्या संगीताचा वारसा बाईंना मिळाला. अख्तरीबाईंचा जन्म ७ ऑक्टोबर १९१४ रोजी फैजाबाद येथे झाला. मुळातच त्यांचा आवाज गोड, सहज फिरत लाभलेला होता त्यास स्मरणशक्ती गुणग्राहकता इत्यादी गुणांची जोड लाभली. त्या दररोज मनापासून दहा, बारातास संगीत साधना करीत असत. त्यामुळे त्यांचा आवाज अधिक सुरेल, झारदार, पिळदार, पल्लेदार, चपळ झाला. ठुमरी, गज़ल, दादरा, सादरा, चैती, कन्ज़री, लोक गीते अधिकाराने त्या गाऊ लागल्या. पतियाळाचे अता महंमदखां आणि किराना घराण्याचे उस्ताद वहीदखां यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. उस्तादी गायकीत त्या तरबेज झाल्या बैठकीत गाऊ लागल्या अशाच एका प्रसंगी कलकत्ता येथे सुप्रसिद्ध गायिका जद्दनबाईच्या गायनावर अख्तरीबाई बेहद्द खूष झाल्या. सिनेतारका नरगीसच्या मातोश्री जद्दनबाई यांचे मार्गदर्शन अखतरी बाईंना मिळाले तसेच ठुमरीनवाज मोईजुद्दीनखां यांच्याकडून गज़ल, ठुमरी, दादरा, सादरा गीत प्रकारांचे मार्गदर्शन घेऊन असंख्य गीते त्यांनी आत्मसात केली. त्यांचे ठिकठिकाणी कार्यक्रम होऊ लागले. तिनशेच्या वर त्यांच्या क्षकाशवाणी ध्वनिमुद्रिका अख्या भारतात निनादू लागल्या. स्पष्ट शब्दोच्चार, रसभाव, आवाजाचा चढउतार, नजाकत, हुकुमी रंगत, पुरबपंजाबी ठुमरीची लकब, गज़ल - शेर- शायरीची खासियत त्यांना उदंड साधली होती. एका चहापान पार्टीच्या प्रसंगी अख्तरीबाईंनी दर्जेदार उर्दू शायर लखनौचे बॅरिस्टर इश्तियाक अहमद अब्बासी यांना आकर्षित केले.

## संदर्भसुची


१) संगीतकला विहार नोव्हे.२००९ - अ.भा.गा.मंडळ, मुंबई

२) ओमनादब्रम्ह - मधवी नानल

३) संगीत मासीक पत्रीका - संगीत कार्यालय,हाथरज

४) संगीत विशारद - वसंत

५) संगीतातील घराणी आणि चरित्रे - डॉ.नारायण मंगरूळकर

:::. Cite this article .:::

Parise, Prof. Dr. S. (2024). संगीत क्षेत्रात महिलांचे सक्षमीकरण आणी योगदान. SK International Journal of Multidisciplinary Research Hub, 11(12), 280–286. https://doi.org/10.61165/sk.publisher.v11i12.57